# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र. 249/2022    दिनांक : 24.06.2022**

## 1)मो. सा. चोरी :-

**भोकर :-** दिनांक 01.01.2022 रोजी चे 12.00 ते 15.00 वा. चे दरम्यान, **घिसेवाड शाळे समोर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो. सा. क्रं. एम.एच.-26/बीई.-9169 किमती 60,000/-रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी आकाश नीलकंठ पांचाळ, वय 22 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. बेंबर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 227/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2090 पांढरे, मो.क्र. 02467-222623** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :-

**कंधार :-** दिनांक 23.06.2022 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **मौजे कुरूळा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे गोठयातील दोन गाई व एक म्हैस असे एकुण 1,05,000/-रूपयाची जनावरे नमुद ठिकाणावरुन चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी अविनाश चंदनशिवे, वय 21 वर्षे, व्यवसाय शेती रा. कुरूळा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 201/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2730 टाकरस, मो.क्र. 9975754256** हे करीत आहेत.

## 3)आत्महत्येस प्रवृत केले :-

**बारड :-**दिनांक 04.05.2022 रोजी 20.00 ते 21.00 वा. चे दरम्यान, **भाऊराव सहकारी साखर कारखाना देगाव (बु.) मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे वैभव लिंबाजी सुर्यवंशी, वय 20 वर्षे, व्यवसाय मजदुर रा. रेऊलगाव ता. वसमत जि. नांदेड,** यांचे वडीलांना 45,000/-रूपये परत मागीतले आरोपीने मयतास तुझी बैलगाडी उबडी घालतो आणि तुझे बैल सोडुन घेवुन जातो. तुम्ही पैसे न देता कारखान्याच्या परिसरातुन कसे निघुन जाता ते बघतो असे म्हणुन वाद घालुन धमकी दिल्याने मयताचे मनावर परिणाम होवुन दिनांक 04.05.2022 रोजी चे रात्री 20.00 ते 21.00 वा. चे दरम्यान लिंबाचे झाडाचे फांदीस दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली वगैरे वरून आ. मृ. क्रं 10/2022 कलम 174 सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. तपासात आत्महत्येस प्रवृत केल्याचे निष्पन्न झाल्याने सकरकातर्फे फिर्यादी दिल्याने गुन्हा उशिराने दाखल करण्यात आला आहे. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सुभाष ग्याणबाजी वानोळे, वय 56 वर्षे, ने. पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 52/2022 कलम 306, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वानोळे, मो.नं. 8208506753** हे करीत आहेत.

## 4)खंडणी :-

**देगलुर :-**दिनांक 01.06.2022 रोजी चे 11.40 वा. चे सुमारास, **धर्माबाद येथे रेल्वेगेट रत्नाळी रोड येथील चहाचे हॉटेल समोर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून माहीती अधिकारा मध्ये फिर्यादीचे विरोधात दिलेला अर्ज मागे घेण्यासाठी व तक्रार मागे घेण्यासाठी व तक्रार न करण्यासाठी 10,000/-रूपये ची मागणी करून फिर्यादीकडुन 5000/-रू ची खंडणी घेतली व फिर्यादीस धमकावल्याने त्यावेळी तक्रार केली नव्हती देगलुर पोलीसानी वर्तमानपत्रात कोणीही खंडणी मागीतली असेल घेतली असेल तर तक्रार देण्याचे आवाहन केल्याने आज रोजी पोलीस स्टेशन देगलुर येथे तक्रार दिली आहे. वगैरे **फिर्यादी दिलीप गंगाधर वडगावे, वय 33 वर्षे, व्यवसाय नौकरी तंत्रज्ञ म. रा. विद्युत वितरण कंपणी मर्यादीत उपविभागीय धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 304/2022 कलम 384, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवुन मृत्यु :-

**भाग्यनगर :-**दिनांक 23.06.2022 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **वैशाली नगर नांदेड येथे,** यातील **मयत नामे कपील अशोक कुरे, वय 17 वर्षे, रा. डोणगांव ह. मु. वैशाली नगर नांदेड,** यांनी वैशालीनगर येथील किरायाने राहात असलेल्या घरात गळफास घेवुन आत्महत्या केला आहे. वगैरे **खबर देणार अशोक आनंदराव कुरे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. डोणगाव (बु.) ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भाग्यनगर** आ. मृ. **34**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/81 बंडेवार, मो.नं. 9923103778** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड